11 JAN 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्करोगावर उपयुक्त नॅनो-धातूकण बनविण्यात यश

## शिवाजी विद्यापीठाचे संशोधन : भारत सरकारकडून राष्ट्रीय पेटंट प्राप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** फौंड्रीच्या सांडपाण्यामध्ये आढळणाऱ्या जिवाणूंच्या जैवरेणूंपासून नॅनो मेटल पार्टीकल्स (नॅनो-धातूकण) बनविण्याची सुलभ व अल्पखर्चिक पद्धती विकसित करण्यात शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या संशोधकांना यश आले आहे. या संशोधनास भारत सरकारकडून नुकतेच पेटंट प्राप्त झाले आहे. विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स व बायोटेक्नॉलॉजी येथील सहायक प्राध्यापक डॉ. किरण दगडू पवार आणि विद्यार्थिनी संशोधक मेघा प्रकाश देसाई यांनी हे संशोधन केले आहे. नॅनो-बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रातील हे एक महत्त्वपूर्ण संशोधन असून, वैद्यकशास्त्र, पर्यावरण, बायोसेन्सिंग आदी क्षेत्रांच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे.

डॉ. पवार म्हणाले, हे मिश्रण पावडर स्वरुपामध्ये उपलब्ध आहे. कर्करोगासाठी वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक उपचार पद्धतीला पर्याय



डॉ. किरण पवार



मेघा देसाई

म्हणून संशोधक नॅनो-जैवतंत्रज्ञान पद्धतीचा अवलंब करत आहेत. यामध्ये मेटल नॅनोपार्टिकल्सचा उपयोग कर्करोगपेशीविरोधक व कर्करोग औषध वितरक म्हणून केला जातो. भविष्यात उपरोक्त पद्धतीने बनवलेले मेटल नॅनोपार्टिकल्स हे नॅनो-जैवतंत्रज्ञान आधारित कर्करोग उपचार पद्धतीमध्ये उपयुक्त ठरू शकतात.

या संशोधनासाठी वापरले गेलेले जिवाणू हे कोल्हापूरनजीकच्या गोकुळ शिरगाव येथील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या फौंड्रीमधील सांडपाण्यामधून मिळविण्यात आले. त्यानंतर त्याची

> हे मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीने झालेले एक महत्त्वाचे संशोधन आहे. याबद्दल संशोधकांचे अभिनंदन करतो आणि याबाबतच्या पुढील संशोधनासाठी सदिच्छा देतो.
>
> – डॉ. दिगंबर शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

ओळख पटवून आंतरराष्ट्रीय डिपॉझिटरी ऑथोरिटी म्हणून मान्यता असलेल्या पुणे येथील नॅशनल सेंटर फॉर मायक्रोबियल रिसोर्सेस येथे जमा केले. या जिवाणूंचा वापर करून त्यापासून जैवरेणू मिश्रण तयार करण्याची नवीन पद्धती त्यांनी विकसित केली. त्यापासून विविध प्रकारचे मेटल नॅनोपार्टीकल्स तयार केले.

या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. विलास शिंदे, स्कूलचे समन्वयक डॉ. किरणकुमार शर्मा यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 JAN 2023
लोकमत

# नऊ जणांची सिनेटवर नियुक्ती

## सांगलीच्या पाचजणांना संधी : कोल्हापूर, साताराचे प्रत्येकी दोघे


लोकमत न्यूज नेटवर्क




शनिल देसाई



श्रीनिवास गायकवाड



संजय परमणे



मनोजकुमार पाटील



काव्यश्री नलवडे



विनिता तेलंग



सुजित शेडगे



सारंग कोल्हापुरे



घनश्याम दीक्षित

कोल्हापूर : राज्यपाल आणि कुलपती भगतसिंग कोश्यारी यांनी कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील नऊ जणांची शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटवर सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. पाच जानेवारीला त्यांनी याबाबतचे पत्र शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना पाठवले आहे. त्यामध्ये कोल्हापूरचे दोघे, सांगलीचे पाचजण तर साताऱ्याच्या दोघांचा समावेश आहे.

शनिल फत्तेसिंह देसाई महागावकर, घनश्याम दीक्षित (दोघे रा. कोल्हापूर), काव्यश्री शरद नलवडे, श्रीनिवास गायकवाड, संजय परमणे, डॉ. मनोजकुमार पाटील, विनिता तेलंग तेलंगवाडा (सर्व रा. सांगली), सारंग कोल्हापुरे, सुजीत शेडगे (दोघे रा.सातारा) अशी या नियुक्त करण्यात आलेल्या सदस्यांची नावे आहेत.

डॉ. दीक्षित हे ज्येष्ठ वनस्पती शास्त्रज्ञ असून त्यांनी विद्यापीठातील वनस्पती विभागाचे प्रमुख होते. शनिल देसाई यांची शेती असून रुग्णालयांना लागणारी उपकरणे पुरवण्याचा त्यांचा व्यवसाय आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे ते नातेवाईक आहेत. सांगलीचे परमणे हे अभाविपचे कार्यकर्ते आहेत.

काव्यश्री नलवडे या उदगावमधील अकिवाटे औद्योगिक वसाहतीत उद्योजक आहेत. मागील तीन वर्षांपासून त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सांगली शहराच्या संपर्कप्रमुख म्हणून काम करतात. साताऱ्याचे शेडगे शिवछत्रपती पुरस्कार विजेते मल्लखांब शिक्षक आहेत. सारंग कोल्हापुरे हे नामवंत सीए आहेत.

महासत्ता

# कुस्ती स्पर्धेत नेहा चौगले, स्वाती शिंदे यांना कास्यपदक

मुरगूड, ता.९(प्रतिनिधी)-

कर्जत ( अहमदनगर) येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय (साई) कुस्ती संकुल व जेएसडब्ल्यू जिंदाल ग्रुपच्या कुस्तीगीर नेहा किरण चौगले व स्वाती संजय शिंदे यांनी कास्यपदक पटकावले.



नेहाने ५० किलो वजन गटात तर स्वातीने ५३ किलो वजन गटात कास्यपदक मिळविले. या दोघींनीही शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करत आपआपल्या गटात यशस्वी कामगिरी केली. कास्यपदकाची अंतिम लढत नेहा विरुध्द रजनी (पंजाब) अशी लढत झाली .एकेरी खेमे डावावर १०विरूध्द ६ गुण फरकाने नेहाने रजनीला पराभूत करुन कास्यपदकाची कमाई केली. स्वाती शिंदेची कास्यपदकाची लढत उत्तर प्रदेशच्या मानसीबरोबर झाली. स्वातीने दुहेरी पट काढून मोळी डावावर मानसीला चितपट केले. नेहा व स्वातीला आंतरराष्ट्रीय कुस्ती कोच दादासो लवटे, वस्ताद सुखदेव येरुडकर,दयानंद खतकर , सागर देसाई यांचे मार्गदर्शन तर खासदार संजय मंडलिक, विरेंद्र मंडलिक, राज्य समन्वयक चंद्रकांत चव्हाण यांचे प्रोत्साहन मिळाले.

पुढारी

# जैवरेणूंपासून नॅनो धातुकण बनविण्याची नवी पद्धत विकसित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

फौंड्रीच्या सांडपाण्यामध्ये आढळणाऱ्या जीवाणूंच्या जैवरेणूंपासून नॅनो मेटल पार्टिकल्स बनविण्याची सुलभ व कमी खर्चाची पद्धत विकसित करण्यात शिवाजी विद्यापीठाला यश आले आहे. विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या संशोधकांनी हे यश मिळवले आहे. या संशोधनाला भारत सरकारकडून पेटंटही मिळाले आहे. नॅनो बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रातील हे महत्त्वपूर्ण संशोधन असून, कर्करोगावरील उपचारासह वैद्यकशास्त्र, पर्यावरण, बायोसेन्सिंग क्षेत्रासाठी ते उपयुक्त ठरणार आहे.

स्कूल ऑफ नॅनो सायन्स व बायोटेक्नॉलॉजीचे सहायक प्रा. डॉ. किरण पवार, विद्यार्थिनी संशोधक मेघा देसाई यांनी हे संशोधन केले. त्यांनी नॅनो धातुकण तयार करण्यासाठी उपयोगी असणाऱ्या जीवाणूंपासून बायोमॉलेक्यूल (जैवरेणू) मिश्रण तयार करण्याची पद्धती विकसित केली आहे. जैवरेणू मिश्रणाचा उपयोग करून पर्यावरणपूरक, कमी खर्चात सुलभ व जलद पद्धतीने मेटल नॅनो पार्टिकल्स तयार केले आहेत.



**प्रा. किरण पवार**




**मेघा देसाई**

- **शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनास राष्ट्रीय पेटंट**
- **कर्करोगावरील उपचारात उपयुक्त**

**पान ४ वर**

11 JAN 2023 पुढारी
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पान ३ वरून




सोने व पॅलेडियमची मेटल नॅनो पार्टिकल्स.

# जैवरेणूंपासून नॅनो धातुकण बनविण्याची नवी पद्धत विकसित

यामुळे जैवसुसंगत मेटल नॅनो पार्टिकल्स तयार करता येऊ शकतात. हे मिश्रण पावडर स्वरूपात उपलब्ध आहे. माणसांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. कर्करोगासाठी वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक उपचार पद्धतीला पर्याय म्हणून संशोधक नॅनो जैवतंत्रज्ञान पद्धतीचा अवलंब करत आहेत. यामध्ये मेटल नॅनो पार्टिकल्सचा उपयोग कर्करोग पेशीविरोधक व कर्करोग औषध वितरक म्हणून केला जातो. मेटल नॅनो पार्टिकल्स सूक्ष्मजीव प्रतिरोधक म्हणून घातक व विषारी घटकांच्या शोधासाठी नॅनो बायोसेन्सर म्हणून वापरले जाऊ शकतात. भारतीय पेटंटसोबतच संशोधन पद्धतीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर पीसीटी-पेटंट मान्यतेसाठीची प्रक्रिया सुरू आहे. संशोधनासाठी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, स्कूलचे समन्वयक डॉ. किरणकुमार शर्मा यांचे मार्गदर्शन मिळाले

> नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागात झालेले पेटंटप्राप्त संशोधन हे मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीने झालेले महत्त्वाचे आहे. वैद्यकशास्त्रासह जैवतंत्रज्ञान, पर्यावरण संवर्धन, बायोसेन्सिंग आदी क्षेत्रांमध्ये संशोधनाचा उपयोग शक्य आहे.
> - डॉ. डी. टी. शिर्के
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

संशोधनासाठी वापरले गेलेले जीवाणू गोकुळ शिरगाव एमआयडीसीमधील फौंड्रीमधील सांडपाण्यामधून मिळविण्यात आले. त्याची ओळख पटवून पुणे येथील नॅशनल सेंटर फॉर मायक्रोबियल रिसोर्सेस येथे ते जमा केले. जीवाणूंचा वापर करून त्यापासून जैवरेणू मिश्रण तयार करण्याची नवीन पद्धती त्यांनी विकसित केली. जैवरेणू मिश्रणाचा उपयोग करून सोने, चांदी, प्लॅटिनम, पॅलॅडियम यासारखे नॅनो पार्टिकल्स तयार केले. जैवरेणू मिश्रणापासून द्विधातू व त्रिधातू नॅनो पार्टिकल्स तयार करण्याच्या पद्धतीवर संशोधन सुरू असल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले.

11 JAN 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभेवर डॉ. दीक्षित, देसाई-महागावकर, नलवडे

## राज्यपाल भवनकडून कुलगुरूंना यादी प्राप्त; नऊ जणांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर ९ जणांची राज्यपालांकडून नियुक्ती करण्यात आली आहे. यात कोल्हापुरातून प्रा.डॉ.घनश्याम दीक्षित, शहनील देसाई-महागावकर, काव्यश्री नलवडे यांचा समावेश आहे. सांगली जिल्ह्यातील श्रीनिवास ऊर्फ विशाल गायकवाड व संजय परमणे या माजी अधिसभा सदस्यांची राज्यपालांकडून सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. राज्यपाल भवनातून याबाबतचे पत्र मंगळवारी कुलगुरूंना प्राप्त झाले आहे.




शिवाजी विद्यापीठ निवडणुका नुकत्याच पार पडल्या आहेत. यात शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीने बाजी मारली आहे. राज्यपाल नियुक्त सदस्यपदी कोणाची वर्णी लागणार, याची उत्सुकता विद्यापीठ कार्यक्षेत्रात होती. अधिसभेवर काही सदस्य पदवीधर, शिक्षक यातून निवडून जातात. काही सदस्यांची नियुक्ती कुलपती (राज्यपाल) करतात. त्यानंतर मंगळवारी राज्यपाल भवनातून नियुक्त सदस्यांची नावे पत्राद्वारे कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के यांना पाठवण्यात आली. राज्यपालांचे मुख्य सचिव संतोष कुमार यांनी याबाबतचे पत्र पाठवले आहे.

यात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींची निवड करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातून शहनील फत्तेसिंह देसाई-महागावकर, डॉ.घनश्याम दीक्षित, काव्यश्री नलवडे तर सांगली जिल्ह्यातून श्रीनिवास ऊर्फ विशाल गायकवाड, संजय परमणे, डॉ. मनोजकुमार पाटील, वनिता तेलंग यांची नियुक्ती करण्यात आली. तर सातारा जिल्ह्यातून सारंग कोल्हापुरे, सुजित शेडगे यांची नियुक्ती झाली आहे.

### निवृत्त प्राध्यापकांची पहिल्यांदाच नियुक्ती

डॉ.घनश्याम दीक्षित हे ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ आहेत. विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख म्हणून ते निवृत्त झाले. विद्यापीठातील निवृत्त प्राध्यापकांची अधिसभा सदस्य म्हणून राज्यपालांकडून नियुक्ती होणे ही पहिलीच घटना आहे.

11 JAN 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरची कुस्ती जगभर पोहोचविणार

## मारिओस : ऑनलाईन पत्रकारितेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर हे कुस्तीचे महत्त्वाचे केंद्र आहे. येथील मातीतील कुस्तीची परंपरा जगभरातील प्रेक्षकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन ग्रीस येथील माहितीपट निर्माते मॅलपित्सास मारिओस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या ऑनलाईन पत्रकारिता माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यामध्ये ते बोलत होते. याप्रसंगी ग्रीस येथील माहितीपट फोटोग्राफर दिमित्रीस सिद्रीदिस, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, व्हिज्युअल स्टोरीटेलर अभिजित गुर्जर, ॲड. वर्षा शिंदे उपस्थित होते.



**कोल्हापूर : ग्रीस येथील माहितीपट निर्माते मॅलपित्सास मारिओस व दिमित्रीस सिद्रीदिस यांचे स्वागत करताना पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव. सोबत डॉ. आलोक जत्राटकर, अभिजित गुर्जर.**

मारिओस म्हणाले, कोल्हापुरातील कुस्ती परंपरा कुतुहलाचा विषय आहे. ग्रीसमध्ये कुस्तीची परंपरा आहे; मात्र कोल्हापुरातील मातीतील कुस्ती हा वेगळा प्रकार असून तो समृद्ध आहे. त्यामुळे आम्ही या परंपरेचा अभ्यास करत आहोत. मातीतील कुस्ती परंपरा कोल्हापुरातील नागरिकांनी जोपासली आहे. शिवाजी विद्यापीठाचा परिसर भारावून टाकणारा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये व्हिज्युअल मानववंशशास्त्र विषयात आम्ही काम करत आहोत. हा विषय अभ्यासक्रमाचा भाग झाला तर जगभरातल्या अभ्यासक संशोधकांना त्याचा उपयोग होऊ शकतो.

दिमित्रीस म्हणाले, खासबाग मैदानातील कुस्ती कॅमेराबद्ध करणे रोमांचकारी अनुभव होता. कोल्हापुरातील कुस्तीशौकिनांचे निरीक्षण केल्यानंतर त्यांची कुस्तीविषयीची जवळीक लक्षात आली. कोल्हापुरातील नागरिकांकडून मिळत असलेले प्रेम आम्ही विसरू शकत नाही. डॉ. आलोक जत्राटकर, ॲड. वर्षा शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

पुढारी

# विद्यापीठातर्फे बी.ए., बी. फार्म., बी.एस्सी. अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत मंगळवारी बीए. बी. फार्म., बीएस्सी यासह ४१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.



विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा २ जानेवारीपासून सुरू झाल्या आहेत. मंगळवारी बीए., एम. कॉम., एमए., बी. फार्म., बी. टेक., मास्टर ऑफ लॉ, बीएस्सी, एमएसडब्ल्यू., बॅचलर ऑफ डिझाईन, मास्टर ऑफ जर्नालिम, बी. व्होक. बीबीए आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये झाल्या.

परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन विद्यापीठ परीक्षा विभागाने केले आहे.

पुढारी




कोल्हापूर : नाईट कॉलेजच्या पुरुष संघास बास्केटबॉल स्पर्धेतील अजिंक्यपदाचा चषक प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)

# बास्केटबॉल स्पर्धेत यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, नाईट कॉलेजला अजिंक्यपद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धेमध्ये महिला गटात यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय व पुरुषांच्या गटात नाईट कॉलेज आर्टस् अँड कॉमर्सला अजिंक्यपद पटकाविले.

शिवाजी विद्यापीठ आयोजित शाहू महाराज यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त विद्यापीठ स्तरीय बास्केटबॉल पुरुष व महिला स्पर्धेचे आयोजन क्रीडा महर्षी मेघनाथ क्रीडा संकुलमध्ये आयोजित करण्यात आले. स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील आठ मुलांचे व सहा मुलींच्या संघाने सहभाग घेतला. चुरशीच्या सामन्यांमध्ये महिलांच्या गटामध्ये प्रथम क्रमांक यशवंतराव चव्हाण महाविद्यालय वारणा, द्वितीय क्रमांक कन्या महाविद्यालय मिरज आणि तृतीय क्रमांक दत्ताजीराव कदम आर्टस्, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय इचलकरंजी यांनी पटकाविला.

पुरुषांच्या सामन्यामध्ये नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स प्रथम क्रमांक देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स द्वितीय तर यशवंतराव चव्हाण महाविद्यालय वारणा यांनी तृतीय क्रमांक मिळविला. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. एन. डी. पाटील, प्रा. बापूसाहेब सरगर, प्रा. किरण पाटील, प्रा. नीलेश पाटील उपस्थित होते.

पुण्यनगरी



कोल्हापूर : अजिंक्यपद पटकावलेला संघ. (छाया : पांडुरंग पाटील)

# वारणा, नाईट कॉलेजला अजिंक्यपद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आयोजित शाहू छत्रपती महाराज यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त विद्यापीठस्तरीय बास्केटबॉल पुरुष व महिला स्पर्धात सांगली, सातारा, कोल्हापूर या तीन जिल्ह्यांमधून आठ मुलांच्या व सहा मुलींच्या संघांनी सहभाग घेतला. महिला गटात यशवंतराव चव्हाण-वारणा महाविद्यालय व पुरुष गटात नाईट कॉलेज आर्टस् अँड कॉमर्सने अजिंक्यपद पटकावले.

महिलांच्या गटामध्ये द्वितीय क्रमांक कन्या महाविद्यालय मिरज आणि तृतीय क्रमांक दत्ताजीराव कदम आर्टस्, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय इचलकरंजी यांनी मिळवला. पुरुषांच्या सामन्यामध्ये कॉलेज ऑफ कॉमर्सने द्वितीय व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला. बक्षीस वितरण कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. शरद बनसोडे, डॉ. एन. डी. पाटील, प्रा. बापूसाहेब सरगर, प्रा. किरण पाटील, प्रा. नीलेश पाटील उपस्थित होते.

11 JAN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## राष्ट्रीय पेटंट : विद्यापीठातील डॉ. किरण पवार, मेघा देसाई यांचे संशोधन

# जैवरेणूंपासून नॅनो-धातूकण बनविणे शक्य

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : फौंड्रीच्या सांडपाण्यामध्ये आढळणाऱ्या जीवाणूंच्या जैवरेणूंपासून नॅनो मेटल पार्टिकल्स (नॅनो-धातूकण) बनविण्याची सुलभ व अल्पखर्चिक पद्धती विकसित करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या संशोधकांनी हे संशोधन केले आहे. या संशोधनास नुकतेच भारत सरकारकडून पेटंट प्राप्त झाले.

विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स व बायोटेक्नॉलॉजी येथील सहाय्यक प्राध्यापक डॉ. किरण दगडू पवार आणि विद्यार्थिनी संशोधक मेघा प्रकाश देसाई यांनी हे संशोधन



डॉ. किरण पवार



डॉ. मेघा देसाई

केले. डॉ. पवार व देसाई यांनी नॅनो-धातूकण (मेटल नॅनोपार्टिकल) तयार करण्यासाठी उपयोगी असणाऱ्या जिवाणूंपासून बायोमॉलेक्यूल (जैवरेणू) मिश्रण तयार करण्याची नवीन पद्धती विकसित केली. या जैवरेणू मिश्रणाचा उपयोग करून पर्यावरणपूरक, कमी खर्चिक, सुलभ, सोप्या व जलद पद्धतीने मेटल नॅनो पार्टिकल्स तयार केले आहेत. या संशोधनासाठी वापरले गेलेले जिवाणू हे गोकुळ शिरगाव



औद्योगिक वसाहतीतल्या फौंड्रीमधील सांडपाण्यामधून मिळविण्यात आले. त्यानंतर त्याची ओळख पटवून आंतरराष्ट्रीय डिपॉझिटरी ऑथॅरिटीची मान्यता असणाऱ्या पुणे येथील नॅशनल सेंटर फॉर मायक्रोबियल रिसोर्सेस येथे जमा केले. या जीवाणूंचा वापर करून त्यापासून जैवरेणू मिश्रण तयार करण्याची नवीन पद्धती त्यांनी विकसित

### कर्करोगासाठी उपयुक्त

▪ कर्करोगासाठी वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक उपचार पद्धतीला पर्याय म्हणून संशोधक नॅनो-जैवतंत्रज्ञान पद्धतीचा अवलंब करत आहेत. यामध्ये मेटल नॅनोपार्टिकल्सचा उपयोग कर्करोगपेशीविरोधक व कर्करोग औषध वितरक म्हणून केला जातो. भविष्यात उपरोक्त पद्धतीने बनवलेले मेटल नॅनोपार्टिकल्स हे नॅनो-जैवतंत्रज्ञान आधारित कर्करोग उपचार पद्धतीमध्ये उपयुक्त ठरू शकतात, असे डॉ. पवार यांनी सांगितले.

केली. त्यापासून विविध प्रकारचे मेटल नॅनोपार्टिकल्स तयार केले. त्यासाठी आवश्यक असे सर्व प्रक्रिया मापदंड (रिएक्शन पॅरामीटर) निश्चित केले. या जैवरेणू मिश्रणाचा उपयोग करून सोने, चांदी, प्लॅटिनम, पॅलॅडियम यांसारखे विविध नॅनोपार्टिकल्स तयार करण्यात यश आले. या जैवरेणू मिश्रणापासून द्विधातू (बायोमॅटॅलिक) व त्रिधातू (ट्रीमेटॅलिक) नॅनोपार्टिकल्स तयार करण्याच्या पद्धतीवरही पुढील संशोधन करण्यात येत आहे.

या संशोधनाबद्दल डॉ. पवार म्हणाले, 'या पद्धतीचा अवलंब करून अल्पखर्चात सोप्या, सुलभ व जलद पद्धतीने जैवसुसंगत (बायोकम्पॅटिबल) मेटल नॅनोपार्टिकल्स तयार करता येऊ शकतात. हे मिश्रण पावडर स्वरूपामध्ये उपलब्ध असून यामार्फत बनवलेले जैवसुसंगत (बायोकम्पॅटिबल) मेटल नॅनोपार्टिकल्स हे जैवतंत्रज्ञान, जैववैद्यकीय, पर्यावरण शास्त्र, बायोसेन्सिंग इत्यादी क्षेत्रांमध्ये उपयोगी ठरेल.' भारतीय पेटंटसोबतच या संशोधन पद्धतीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर पीसीटी-पेटंट मान्यतेसाठीची प्रक्रिया सुद्धा सुरू आहे. या संशोधनासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. किरणकुमार शर्मा यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

सकाळ

# डॉ. दीक्षित, देसाई-महागावकर विद्यापीठ अधिसभा सदस्य

## राज्यपालांकडून नियुक्ती : एकूण ९ जणांचा समावेश

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये ९ जणांची राज्यपालांकडून नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये कोल्हापुरातून प्रा. डॉ. घनश्याम दीक्षित आणि शहनिल देसाई महागावकर यांचा समावेश आहे. सांगली जिल्ह्यातील श्रीनिवास ऊर्फ विशाल गायकवाड आणि संजय परमणे या माजी अधिसभा सदस्यांची राज्यपालांकडून सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल भवनातून याबाबतचे पत्र आज कुलगुरूंना देण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाचे संचालन अधिसभा आणि व्यवस्थापन परिषदेकडून केले जाते. अधिसभेवर काही सदस्य पदवीधर, शिक्षक यातून निवडून जातात तर काही सदस्यांची नियुक्ती कुलपती (राज्यपाल) करतात. शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांची निवडणूक गेल्या महिन्यात झाली. त्यानंतर आज राज्यपाल भवनातून नियुक्त सदस्यांची नावे पत्राद्वारे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना पाठवण्यात आली.

राज्यपालांचे मुख्य सचिव संतोष कुमार यांनी याबाबतचे पत्र पाठवले आहे. यामध्ये सांगली, सातारा आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांतील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींची निवड करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातून शहनिल फत्तेसिंह देसाई - महागावकर आणि डॉ. घनश्याम दीक्षित, काव्यश्री नलवडे यांची निवड करण्यात आली आहे. सांगली जिल्ह्यातून श्रीनिवास ऊर्फ विशाल गायकवाड, संजय परमणे, डॉ. मनोजकुमार पाटील, वनिता तेलंग यांची नियुक्ती करण्यात आली. सातारा जिल्ह्यातून सारंग कोल्हापुरे, सुजित शेडगे यांना नियुक्त करण्यात आले.

### निवृत्त प्राध्यापकांची पहिल्यांदाच नियुक्ती

■ डॉ. घनश्याम दीक्षित हे ज्येष्ठ वनस्पती तज्ज्ञ आहेत. विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख म्हणून ते निवृत्त झाले आहेत. विद्यापीठातील निवृत्त प्राध्यापकांची अधिसभा सदस्य म्हणून राज्यपालांकडून नियुक्ती होणे ही पहिलीच घटना आहे.

तरुण भारत

# राज्यपाल नियुक्त नऊ सिनेट सदस्यांची नावे जाहीर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अधिसभेवर राज्यपाल कार्यालयाकडून १० पैकी ९ सिनेट सदस्यांची नावे जाहीर केली आहेत. याबाबतचे पत्र कुलगुरू कार्यालयाला ईमेलव्दारे पाठवले आहे. त्यामुळे विद्यापीठ परिक्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. उर्वरीत एका जागेसाठी कोणाचे नाव जाहीर होणार याकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

जाहीर सदस्यांपैकी कोल्हापूर जिल्ह्यातील तीन, सांगली जिल्ह्यातील चार तर सातारा जिल्ह्यातील दोन सदस्यांचा समावेश आहे. अधिसभेत विद्यापीठातील जीवशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. घनश्याम दीक्षित, सहनील देसाई–महागावकर, शरद नलवडे यांचा समावेश आहे. सांगली जिल्ह्यातील श्रीनिवास गायकवाड, संजय परमणे, विनिता तेलंग, डॉ. मनोजकुमार पाटील यांची सिनेट सदस्य म्हणून नियुक्ती झाली. श्रीनिवास गायकवाड आणि संजय परमणे गतवेळी सिनेट सदस्य म्हणून निवडून आले होते. यंदा मात्र गायकवाड आणि परमाने यांची राज्यपालांनी सिनेट प्रतिनिधी म्हणून निवड केली आहे. सातारा जिल्ह्यातून सारंग कोल्हापुरे, सुजित शेडगे यांना राज्यपालांकडून सिनेटवर संधी मिळाली आहे.

**निवृत्त प्राध्यापकाची पहिल्यांदाच निवड**

शिवाजी विद्यापीठातील जीवशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. घनश्याम दीक्षित हे सेवेतून निवृत्त झाले आहेत. तरीही त्यांची राज्यपालांनी नियुक्ती केली आहे. विद्यापीठाच्या स्थापनेत पहिल्यांदाच निवृत्त प्राध्यापकांची नियुक्ती केली आहे.